स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 06–03–2014** रोजी **सकाळी 10–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | सभापती |
| 2. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 3. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 4. | सौ. विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 5. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 6. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 7. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 8. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 9. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |
| 10. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | सदस्य |
| 2. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 3. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 4. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 5. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री.संजय काकडे, उपनिनगम आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

श्री. किशोर गजभिये :– मा. सभापती महोदय, काल निवडणुक आयोगाने 16 व्या लोकसभा निवडणुकीची घोषणा केली आणि घोषणा झाल्यानंतर संपुर्ण देशामध्ये आचार संहिता लागू करण्यात आलेली आहे या आचार सहिंतेमध्ये आज आपण या ठिकाणी बैठक घेत आहे या बैठकीची विषयपत्रिका आहे त्या विषयपत्रिकेवर काही निर्णय घेवू शकतो की नाही याची माहिती प्रशासनाकडुन देण्यात यावी.

निगम सचिव :– मा. सभापती महोदय, आचार सहिंता लागल्यानंतर आपल्याला बैठक घेता येईल परंतु त्यामध्ये विषय पत्रिकेवरील विषय आहे त्यावर निर्णय घेवु शकत नाही नविन कोणताही कार्यादेश देवु शकत नाही अशा परिस्थितीमध्ये विषयपत्रिकेवरील विषयावर निर्णय करु शकत नाही. मार्गदर्शक तत्वे आपल्याकडे आहे त्यामध्ये पाणी पुरवठयाशी रिलेटेड आपातकालीन स्थिती निर्माण झाली तर अशा परिस्थीती मध्ये पाणी पुरवठया संदर्भात कामे असतील त्या कामाला मान्यता देवु शकतो.

श्री. किशोर गजभिये :– मा. सभापती महोदय, निगम सचिवांनी माहिती ठेवली आहे परंतु आपल्याकडे विषयपत्रिकेवरील विषय आहे त्यातील काही विषय घेता येते नाही घेता येत नसेल तर आजची सभा स्थगित करायची काय ?

निगम सचिव :– सभा स्थगित करायची आहे.

श्री. किशोर गजभिये :–. मा. सभापती महोदय, विषय क्र. 20 च्या अनुषंगाने – वर्ष 2013 मध्ये अतिवृष्टीमुळे पांढराबोडी तलावाचे पाणी काही रहिवासी क्षेत्रात घुसले होते, त्यामुळे तेथील नागरी वसाहतीत वित्तीय हानी झाली होती. या कामाचे महत्व लक्षात घेता जर आचार संहिता संपल्यावर हे काम पावसाळयाच्या तोंडावर सुरु झाल्यास काम होणे शक्य होणार नाही. उपरोक्त विषय हा पाणी संवर्धनाचा विषय असुन नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने या कामाची परवानगीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनमार्फत निवडणुक आयोगाची परवानगी घेण्यात यावी व परवानगी प्राप्त झाल्यास ती रितसर स्थायी समिती समोर ठेवावी तो पर्यत हा विषय पत्रिकेवर स्थगीत ठेवण्यात यावा.

मा.सभापती :– या विषयासंदर्भात राज्य निवडणुक आयोगाला पत्र पाठवुन त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.

<u>ठराव क्रमांक 03</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर